# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १३.१०.२०२६
**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (०७.१०.२०२६ ते १३.१०.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१४.१०.२०२६ ते १८.१०.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ | दिनांक | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | २ | ३ | ५ | ९ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३६ | ३६ | ३६ | ३५ | ३४ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | १९ | २० | २२ | २३ | २१ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | २ | २ | ३ | ५ | ७ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७२ | ७७ | ८० | ८६ | ९३ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४० | ३९ | ३९ | ४५ | ५२ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ७ | ६ | ६ | २ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | ई. | पू.ई. | पू. | उ.ई. | पू.ई. |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यामध्ये १४ व १५ ऑक्टोबर रोजी आकाश मुख्यत: स्वच्छ तसेच १६, १७ व १८ ऑक्टोबर रोजी आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. **सातारा जिल्ह्यामध्ये व जिल्ह्यातील घाट भागात १६, १७ व १८ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये १८ ऑक्टोबर पर्यंत कमाल तापमान ३४.० ते ३६.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान १९.० ते २३.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.** सकाळची सापेक्ष आद्रता ७२ ते ९३% या दरम्यान, दुपारची सापेक्ष आद्रता ३९ ते ५२% या दरम्यान राहण्याची तसेच वाऱ्याचा वेग ताशी ०२ ते ०७ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान इशारा | | **सातारा जिल्हा व घाट भागामध्ये १६ व १७ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे** |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक १६ ते २२ ऑक्टोबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी दरम्यान राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ कीटकनाशके व बुरशीनाशकांची फवारणी पावसाची उघडीप पाहून आणि वारा शांत असताना करावी.<br>➢ खरीप पिकांना तसेच फळे व भाजीपाला पिकांना पाणी देण्यासाठी शक्यतो ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा<br>➢ फळे तसेच भाजीपाला पिकांमध्ये शक्य असल्यास आच्छादनांचा वापर करावा<br>➢ **१६ ते १८ ऑक्टोबर दरम्यान पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या भात, मका, सोयाबीन व भुईमूग पिकांची काढणी करावी. शक्य असल्यास मळणी पूर्ण करावी व तयार झालेला शेतमाल त्वरित कोरड्या व सुरक्षित ठिकाणी ठेवावा.** |
| संदेश | | ➢ **रब्बी हंगामासाठी पाण्याचा अंदाज घेऊनच त्यानुसार योग्य पिकाची आणि वाणांची निवड करावी** |
| भात | दाणे भरणे ते पक्वता | ➢ कडा करपा रोगाच्या प्रतीबांधासाठी स्ट्रेप्टोसायक्लीन २ मिलि + कॉपर ऑक्सीक्लोराईड २० ग्रॅम प्रती पंप यापमाणात फवारणी करावी<br>➢ लवकर पेरणी केलेल्या तसेच कमी कलावधीत पक्व झालेल्या भात वाणांची काढणी करावी व काढणी व मळणी करून तयार झालेला शेतीमाल सुरक्षित ठिकानी ठेवावा |
| रब्बी ज्वारी | पेरणी | ➢ पुरेश्या पाण्याची उपलब्धता असल्यासच रब्बी हंगामामध्ये ज्वारीची पेरणी पावसाच्या ओलीवर ५ सें.मी. खोलीपर्यंत करावी.<br>➢ पेरणी ४५ x १५ सें.मी. अंतरावर करावी.<br>➢ बीजप्रक्रिया: पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ४ ग्रॅम गंधक (३०० मेश पोताचे) चोळावे तसेच २५ ग्रॅम अ‍ॅझोटोबॅक्टर व पी.एस.बी. कल्चर चोळावे. |
| मका | दाणे भरणे / पूर्वमशागत | ➢ दाणे भरण्याच्या अवस्थेत असताना संरक्षित पाण्याची उपलब्धता करून द्यावी<br>➢ १५ ते १७ ऑक्टोबर दरम्यान पक्व झालेल्या पिकाची काढणी करावी व काढणी व मळणी करून तयार शेतीमाल सुरक्षित ठेवावा<br>➢ पाण्याची उपलब्धता असल्यासच रब्बी हंगामासाठी मका लागवड करण्याकरिता पूर्व मशागत सुरू करावी |
| हरभरा | पेरणी | ➢ जिरायती हरभरा पेरणीसाठी लागणाऱ्या बियाणे, खते यांची उपलब्धता करून घ्यावी तसेच जिरायत हरभरा पेरणी २० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर या दरम्यान जमिनीमध्ये वाफसा असताना करावी<br>➢ पेरणीकरता फुले विक्रम, फुले विश्वराज, विजय, इ. वाणांची निवड करावी<br>➢ बिजप्रक्रीया करणे अत्यंत महत्त्वाचे असुन खरीप हंगामातील सोयाबीन पीक निघाल्यानंतर मुळ कुज व मान कुज या रोगापासून संरक्षण होण्यासाठी ट्रायकोडर्मा हरजियानाम १.०% डब्ल्यू. पी. ६ ग्रॅम प्रति किलो बीजप्रकियेसाठी तसेच आळवणीसाठी लागवडीनंतर ५० |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | चोळावे. असे बियाणे तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी. यामुळे पिकाचे रोप अवस्थेत बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण होते. मुळावरील नत्राच्या ग्रंथी वाढतात आणि पिकाची वाढ चांगली होते.<br>➢ हरभऱ्यावरील घाटे आळीच्या एकात्मिक नियंत्रणासाठी पेरणीच्या वेळी हेक्टरी २०० ग्रॅम ज्वारी हरभरा पेरताना मिसळून पेरावी |
| ऊस | शाकिय वाढ | ➢ सिंचनासाठी पुरेशा पाण्याची खात्री झाल्याशिवाय पूर्वहंगामी ऊस लागवडीची पूर्वतयारी सुरू करू नये.<br>➢ **वाढलेली आर्द्रता आणि कमाल तापमानामुळे काही ठिकाणी ऊस पिकावर लोकरी माव्याचा प्रादुर्भाव आढळून येत आहे.** प्रादुर्भाव दिसताच इमिडाक्लोप्रिड १७.८% एसएल ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| सोयाबीन | शेंगा भरणे ते पक्वता | ➢ शेंगांचा रंग पिवळट तांबुस झाल्यानंतर, जातीच्या पक्वतेच्या कालावधीनुसार १०० ते ११० दिवसांत काढणी करावी. पीक काढणीस उशीर झाल्यास शेंग फुटण्यास सुरुवात होते. पिकाची कापणी धारदार विळयाच्या सहाय्याने जमिनीलगत करावी. काढणी केलेला शेतीमाल त्वरित सुरक्षित ठिकाणी ठेवावा<br>➢ उशिरा लागवड केलेल्या व उशिरा पक्व होणाऱ्या वाणांना शेंगा भरण्याच्या अवस्थेत ००.००.५० या विद्राव्य खताची १० ग्रॅम प्रती लीटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी. |
| भुईमुग | पक्वता | ➢ भुईमुग पीक पक्व झाल्यास पाने पिवळी पडू लागतात. शेंगाचे टरफल टणक बनते व शेंगाच्या टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागते. पक्व झालेल्या पिकाची वेळेत काढणी करावी. तोडणी केलेल्या शेंगा पुरेशे ऊन पडताच उन्हात वाळवाव्यात व कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात. शेंगांची साठवण कोंदट व ओलसर जागेत करू नये. |
| हळद | कंद वाढीची | ➢ **मागील आठवड्यातील ढगाळ व दमट हवामानामुळे काही ठिकाणी पानांवरील करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहेरोगाच्या .** नियंत्रणासाठी ॲझॉक्सिस्ट्रोबिन १८.११डायफेनोकोनॅझोल + %२.४ एससी %@ १० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| स्ट्रॉबेरी | लागवड | ➢ **लवकर लागवड केली आहे अश्या ठिकाणी मूळ कुज व खोड कुज नियंत्रणासाठी फुले सुपर बायोमिक्स** २०० मिलि प्रती १० लीटर पाणी या प्रमाणात आळवणीद्वारे द्यावे किंवा ठिबक सिंचांनाद्वारे ४ लीटर फुले सुपर बायोमिक्स २०० लीटर पाण्यातून १ एकर क्षेत्रासाठी वापरावे<br>➢ अन्नद्रव्य व्यवस्थापनामध्ये ४५:२५:१८ किलो नत्र, स्फुरद व पालाश प्रती हेक्टरी ५ समान हप्त्यांमध्ये लागवडीनंतर १ महिन्यांमध्ये ठिबक सिंचांनाद्वारे द्यावे<br>➢ स्ट्रॉबेरीची लागवड बेडवर दोन ओळींमध्ये करावी. प्रत्येक बेडवर ठिबक सिंचनाच्या दोन लॅटरल नळया अंथरून प्रत्येक झाडासाठी एक ड्रीपर बसवावा. प्रत्येक ड्रीपरची पाणी विसर्ग क्षमता २ लिटर प्रति तास असावी. |
| आले | कंद वाढीची | ➢ आले पिकास पाण्याची उपलब्धता करून द्यावी<br>➢ अळया उघड्या गड्ड्यामध्ये शिरून कंदावर उपजिविका करतात. अशा गड्ड्यामध्ये नंतर रोगकारक बुरशी तसेच सूत्रकृमिंची शिरकाव होतो. त्यामुळे खोड व गड्डे मऊ होतात व त्यांना पाणी सुटून ते कुजतात.<br>➢ कंदमाशी : नियंत्रण : वेळेवर भरणी करावी. हेक्टरी ६ नग माती अथवा प्लॅस्टिकची पसरट भांडी वापरून प्रत्येक भांड्यात भरडलेले एरंडीचे बी २०० ग्रॅम + १.५ लिटर पाणी घ्यावे. ८ ते १० दिवसांनी या मिश्रणातून वास बाहेर निघू लागल्यावर कंदमाशी आकर्षित होऊन मरू लागतात. सदरची उपाय योजना अत्यंत प्रभावी, कमी खर्चिक व सहजरित्या करता येण्यासारखी असल्याने सेंद्रिय आले उत्पादनामध्ये महत्त्वाची भूमिका निभावणारी ठरु शकते. तसेच अळयांकडून कंदाचे नुकसान करण्या अगोदरच कंदमाशा मरत असल्याने विशेष प्रभावी आहे |
| पशुधन | वाढीची | ➢ जनावरांना लाळया खुरकत रोगापासून बचावासाठी तज्ञ पशुवैद्यकाच्या सल्ल्याने निरोगी जनावरांना लसीकरण करून घ्यावे<br>➢ जमिनीत पुरेशी ओल असल्यास, जनावरांच्या चाऱ्याची टंचाई भासू नये म्हणून रब्बी ज्वारीची पेरणी करावी. पाण्याची शाश्वत सोय असल्यास हायब्रिड नेपिअर (गजराज) गवताची लागवड करावी.<br>➢ चारा मका उपलब्ध असल्यास त्यापासून सायलेज (मुरघास) तयार करावे. |

| | |
|---|---|
| मेघदूत ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कोल्हापूर

दि. : १३.१०.२०२६

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर